मिरा भाईंदर महानगरपालिका
माहिती व जनसंपर्क विभाग
प्रसिद्धीपत्रक

- **परवाना शुल्क न भरणाऱ्या गॅरेज चालकांवर मिरा भाईंदर महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत धडक कारवाई.**
- **४७ गॅरेज चालकांकडून रु. ३ लाख ७० हजार इतका परवाना शुल्क वसूल.**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात परवाना शुल्क थकबाकी असलेल्या गॅरेज चालकांकडून शुल्क वसुली मोहीम राबवण्यात येत आहे. दिनांक २१ मार्च २०२५ पर्यंत महापालिका प्रभाग समिती क्रमांक ०१ ते ०६ अंतर्गत एकूण ४७ गॅरेजवर कारवाई करून रु. ३ लाख ७० हजार इतका परवाना शुल्क वसूल करण्यात आला आहे. सदरची कारवाई अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, अतिक्रमण विभाग अधिकारी नरेंद्र चव्हाण आणि प्रभागनिहाय सहाय्यक आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सुमारे २०० परवानाधारक गॅरेज आहेत. या गॅरेज चालकांकडून प्रतिवर्षी मिरा भाईंदर महानगरपालिकामार्फत अल्प दरात परवाना शुल्क वसूल केला जातो. मा. आयुक्त यांनी वेळेवर परवाना शुल्क न भरणाऱ्या गॅरेज चालकांवर कारवाई करण्याचे आदेश यापूर्वी बैठकीत सर्व प्रभाग निहाय सहाय्यक आयुक्त यांना दिले आहेत. त्या अनुषंगाने दिनांक २१ मार्च २०२५ पर्यंत एकूण ४७ गॅरेजवर कारवाई करून रु. ३ लाख ७० हजार इतका परवाना शुल्क वसुलीची कारवाई महापालिका अतिक्रमण विभागामार्फत करण्यात आली आहे. यापुढेही परवाना शुल्क थकबाकी असलेल्या गॅरेज चालकांकडून शुल्क वसुली करून रीतसर कारवाई करण्यात येणार असल्याचे मा. आयुक्त यांनी सांगितले आहे. तरी, सदरची कारवाई टाळण्याकरिता मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गॅरेज चालकांनी वेळेत परवाना शुल्क भरणा करण्याचे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.